जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/०९/२०२४
## दि.१७/०९/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विदयापीठ पो स्टे ७५२/२०२४ भा.न्या.सं.कलम १०६(२) मोटार वाहन कलम ११९/१७७, १३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | विठठल एकनाथ चिपाडे,पोलीस अंमलदार, नेमणुक भारती विदयापीठ पो.स्टे.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात टँकर चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १७/०९/२०२४ रोजी सकाळी ०६/१५ ते ०६/३०वा.चे सुमा.कात्रज चौकाकडुन गोकुळनगर चौकाकडे जाणारे रोडवर,कात्रज चौक,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील टँकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार मुलगी नामे मानसी रमेश पवार,वय २४ वर्षे रा.सर्व्हे नंबर ३०/५,जयशंकर सोसायटी, जिजामाता चौक,आंबेगाव पठार पुणे हिचे दुचाकीस धडक देवुन गंभीर जखमी करून,तिच्या मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सुरेश शिदे मो.नं. ९९२३२८१९८१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४६२/२०२४ भा.द.वि कलम ४१९,४२०,३४ माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३६ वर्षे, रा.हांडेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०१/२०२४ ते दि.१४/०२/२०२४ दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद अनोळखी मोबाईल धारक इसमांनी विश्वास संपादन करुन ट्रेडिंगमध्ये गुंतवणुक करुन त्यामधुन चांगला परतावा मिळेल असे आमिष दाखवुन फिर्यादी यांची २४,३५,०००/- रुपये इतक्या रक्कमेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी (गुन्हे) निलेश जगदाळे मो.नं.९०४९९८१२२१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४६४/२०२४ भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),३(५)सह आय.टी.ॲक्ट ६६ डी |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३३ वर्षे, रा.हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०८/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील नमुद मोबाईल धारक इसमांनी त्यांचे फेडेक्सचे पार्सल आले असल्याचे सांगुन तुमच्या विरोधात मनी लॉन्ड्रिंगची केस असुन त्याची चौकशी करण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांना स्काईप ॲप डाऊनलोड करावयास लावुन स्काईप आयडी स्क्रिन शेअर करण्यास सांगुन बँकेमधुन लोन घेण्यास भाग पाडुन चेकिंग नावाखाली विविध बँक अकाऊंट वर पैसे ट्रान्सफर करण्यास सांगुन फिर्यादी यांची १२,९८,८८८/- रुपयेची आर्थिक फसवणुक केली |
| **त.अंमलदार** | पो.निरी (गुन्हे) निलेश जगदाळे मो.नं.९०४९९८१२२१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुश्रृंगी पो स्टे ७४९/२०२४ भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(सी),६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४२ वर्ष रा.बालेवाडी गाव,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद मोबाईल अनोळखी इसमांनी विश्वास संपादन करुन सेल्फ ड्राईव्ह कार तसेच कॅब बुकिंग करण्याच्या बहाण्याने १५०/-रू.बुकिंग अमाऊंट भरण्यास सांगुन मोबाईल क्रमांकावरती लिंक पाठवुन सदर लिंकवर माहीती भरण्यास सांगून फिर्यादी यांची ९,९३,८६९/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी (गुन्हे) पाटील मो.नं.८१०८८००३८१ |

## दि.१८/०९/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १८२/२०२४, भा.न्या.सं.कलम ३०६,३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४६ वर्षे, रा.मंगळवार पेठ पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०८/२०२४ रोजी रात्रौ ०२/१५ वा ते ०२/३० वा.चे दरम्यान श्रीकृष्ण गोल्डस्मिथ, ९३१, रविवार पेठ,दगडी नागोबा जवळ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे कडे कामगार म्हणुन कामास असणारे यातील नमुद इसम यांनी वर नमुद केले ता.वेळी टेबलचे ड्राव्हर मध्ये ठेवलेल्या चावीचे सहाय्याने तिजोरीचा दरवाजा उघडुन एकुण ४८० ग्रॅम वजनाचे २२ कॅरेट सोन्याचे अर्धवट तयार माल त्याची एकुण ३२,१६,०००/- रु.किमत व वजनाचा माल फिर्यादी यांचे सहमती शिवाय चोरी करून घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अरविंद शिंदे,मो.नं.९२८४११८०१८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**